# सादग्राम संकल्पना आणि सर्वेक्षण

**– हरीश बुटले**

कोणत्याही गावातील जागरुक नागरिकाला आपल्या गावाची स्थिती स्वत: जाणून घेता यावी, यासाठी समग्र ग्रामविकासाची एकत्रित अशी कोणतीही यंत्रणा केंद्र अथवा राज्य पातळीवर कार्यरत नसल्याचे लक्षात आले. त्यावेळी आपल्या गावाबद्दल वास्तविक स्थितीचा आढावा घेणारी यंत्रणा असावी आणि विकसित व्हावी, असे मनात आले. त्यातूनच सादग्राम सर्वेक्षण कल्पना पुढे आली. सर्वांना सहजरित्या मोबाईलवरही सर्वेक्षण करता यावे, यासाठी सादग्राम नावाचे ॲप्लिकेशन तयार करण्यात आले. या संपूर्ण प्रक्रियेची चाचणी कोठारी येथे करण्यात आली. सरपंचांनी विशेष बैठक बोलावून सर्व सदस्यांसमोर ही प्रक्रिया समजून घेतली. त्यानंतर गटनिहाय गुणदान करण्यात आले. या सर्व प्रक्रियेनंतर असे लक्षात आले की, कोठारी हे गाव मुख्य राज्य मार्गावर असलेले गाव सर्व सोयी–सुविधांनी युक्त असूनही,पाण्याचा फारसा प्रश्न नसतानाही १२०० पैकी जेमतेम ६५७ गुण मिळाले. यावरुन त्याची प्रतवारी बरी आली आहे, असा निष्कर्ष निघाला. कोठारीसारख्या गावाची ही स्थिती असेल तर राज्यातील अशी अनेक ठिकाणे आहेत, ज्याची प्रतवारी सर्वसाधारण, वाईट आणि खूप वाईट अशी असू शकेल.

कोठारीचे सर्वेक्षण सुरू करण्याआधी सर्वेक्षण सुरु करण्याआधी सरपंच आणि सर्व उपस्थित सदस्यांना गावातील कोणत्या बाबीबाबत आपणास अभिमान आहे, असे विचारण्यात आले. त्यावेळी सर्वांनी गावातील स्वच्छतेबाबत समाधान व्यक्त केले आणि गावातील स्वच्छता ही चांगली असल्याचे कबूल केले. मात्र, ज्यावेळी स्वच्छतेविषयीचे निकष पुढे येत गेले, आणि अंतिमत: गावाला स्वच्छता या विषयावर ८० पैकी २० गुण मिळाले त्यावेळी विलंब न करता सरपंचांनी गावाच्या स्वच्छतेकडे लक्ष द्यावे लागेल याविषयी सहमती दर्शवली. अशा प्रकारे, या सर्वेक्षणातून आपणास वरकरणी वाटणारी स्थिती आणि वास्तव स्थिती याची जाण तातडीने होते. त्यामुळे प्रत्येक नागरिक जागरुक होऊ शकतो. तसेच, राज्य शासन, केंद्र शासन किंवा जिल्हा परिषदेच्या माध्यमातून मिळणा–या सोयी–सुविधा, अनुदान किती प्रमाणात मिळते, याचीही जाणीव प्रत्येन नागरिकाला होते. सादग्राम सर्वेक्षणामुळे समग्र ग्रामविकासासाठीचे व्यापक एक प्रकारची यंत्रणा निर्माण झाली असून, त्याचा प्रत्येक गावातील जागरुक नागरिकाने लाभ घेऊन आपापल्या गावाची वास्तविक स्थिती काय आहे ती जाणून घ्यावी व समस्यांकडे गावाचे लक्ष वेधावे.

एकूण १२ घटकांपैकी ज्या घटकांवर २५% पेक्षा कमी गुण मिळतात, अशा घटकांविषयी तातडीने उपाययोजना करायला सुरुवात करावी. ज्या घटकांना ५० टक्क्यापेक्षा कमी गुण आहेत, अशांवर योग्य विचार करुन सुधारणेचा आराखडा तयार करावा. ज्या घटकांवर ७५ हून कमी गुण मिळाले, त्यावर आणखी सुधारणा कशी करता येईल, याविषयी मंथन करावे. आणि ज्या घटकांवर ७५ हून जास्त गुण मिळाले आहेत, असे घटक गावाची खरी शक्ती आहे. ती बलस्थाने योग्य रितीने वापरुन गावाचा विकास साधावा.









ग्रामपंचायत कोठारी येथे सादग्राम सर्वेक्षण करताना हरीश बुटले. सोबत सरपंच व ग्रामपंचायत पदाधिकारी.